# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २३/१२/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१८) इतिवृत्त

**मंगळवार,** दिनांक **२३ डिसेंबर २००८ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "**मलीक अंबर स्थायी समिती सभागृह**" येथे **दुपारी १२-०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(प्र.) श्री.एम.वाय.कांबळे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान मामु
२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. श्री.वसंत नरवडे पाटील
५. सौ. अल्पा विकास जैन
६. श्री. संजय रामदास जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१०. श्री. कचरू सोनवणे
११. श्री. कचरू मोरे
१२. श्री. सिताराम सुरे
१३. श्री. नारायण कुचे

**<u>संवाद :</u>**

श्री.अ. रशिद मामु : वॉर्ड अ मध्ये ज्युनिअर इंजिनिअर कोण आहे.

कार्यकारी अभियंता : वॉर्ड अ मध्ये श्री.वामन कांबळे ज्युनिअर इंजिनिअर आहे.

श्री.अ.रशिद मामु : श्री.वामन कांबळे हे कार्यालयात हजर राहत नाही, त्यांचे जागी दुसरा अभियंता देण्यात यावा. त्यांचे लातूरला मोठमोठे महाविद्यालये आहेत. त्यांनी नऊ महिण्यापर्यंन्त एकही ईस्टीमेट तयार केलेले नाही. १७ वॉर्डात कामे कसे होणार. ४ कनिष्ठ अभियंता बदलले. कोण काम करणार, नविन अभियंता द्यावे. ते काम करीत नसेल तर बदली करावी.

मा.सभापती : श्री.वामन कांबळे, कनिष्ठ अभियंता आहेत त्यांनी ९ महिण्यांपासून एकही इस्टीमेट तयार केलेले नाही व ते वार्डतही

हजर राहत नाही. अद्याप माझ्याकडे तक्रार नाही. असेल तर कार्यवाही करू. दुसरे कनिष्ठ अभियंता देवू.

शहर अभियंता : माझ्या पहाण्यात सदरची तक्रार आलेली नाही परंतु असेल तर माहिती घेवून संबधीतावर कारवाई करू. तसेच एक अभियंताची वॉर्डात व्यवस्था करण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे पाटील : वार्ड-ड मध्ये काही अभियंत्याच्या बदल्या झालेल्या आहेत त्यात श्री.खन्ना यांची टाउन प्लॅनिंगमध्ये बदली केलेली आहे. त्याठिकाणी दोन चार्ज असलेले श्री.कोल्हे यांचेक्डे ज्युनिअर इंजिनियर नाही. वॉर्डातील पाण्याच्या, लाईट, ड्रेनेजच्या तक्रारी घेण्यासाठी कुणीही लिपीक नाही. तक्रार कोणी घेत नाही त्यामुळे तक्रारींची नोंद घेण्यासाठी कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावा. श्री.शिंदे एकच क.अभियंता आहे. राजपुत नाही. स्वतंत्र वॉर्ड अभियंता द्यावे. ड्रेनेज, लाईट व पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नाहीत.

मा.सभापती : दि.३१.०३.२००९ पर्यंत कामे करावयाचे असल्यामुळे वार्ड-ड मध्ये एका इंजिनिअरची व्यवस्था करण्यात यावी.

शहर अभियंता : कार्यकारी अभियंतांशी चर्चा केली आहे कनिष्ठ अभियंत्याचा तुटवडा आहे, कामावर देखरेखीसाठी पीएमसीवर मोठया प्रमाणात खर्च करतो, कंत्राटीपध्दतीने कनिष्ठ अभियंत्याची नियुक्ती केली तर पीएमसीवर होणारा खर्च वाचेल व बहुसंख्य सदस्यांची अडचण दुर होईल.

मा.सभापती : तसा प्रस्ताव पाठविण्यात यावा व दोन दिवसांत (वॉर्ड ड मध्ये) उपआयुक्त(म.) यांनी सांगीतल्यानुसार दोन दिवसांत वॉर्ड इंजिनिअरची नियुक्ती करण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे पाटील : पीएमसी मार्च नंतर नेमण्यात यावे, ३१.१२.२००८ पर्यंत मुख्य लेखापरिक्षक यांनी सांगीतल्याप्रमाणे स्वेच्छा निधीचे कामे, निधी खर्च करण्याकरीता लागणारी व्यवस्था पीएमसी नेमणे आणि पीएमसी नेमल्यानंतर त्याच्या हाताखाली पुन्हा पीएमसी नेमली जाते. फक्त एस्टीमेट पर्यंतच मर्यादीत असावे. महानगरपालिकेच्या कामाचा दर्जा, गैरव्यवहार यावरही लक्ष पाहिजे.

श्री.संजय जोशी : ३१ मार्च पर्यंत इस्टीमेट तयार करावयाचे आहे, एक वर्ष झाले २० हजाराचेही इस्टीमेट तयार झालेले नाही. पीएमसीचा प्रस्ताव नंतरचा आहे तातडीची उपाययोजना काय आहे.

श्री.वसंत नरवडे पाटील : ज्या ठिकाणी अभियंता कमी आहे त्या ठिकाणी जे जे पदोन्नतीसाठी डयु आहेत त्यांना प्रमोशन देण्यात यावे. ३१ मार्च ही खर्च करायची शेवटची तारीख आहे.

श्री.संजय जोशी : काही विभागात कनिष्ठ अभियंत्याची गरज नाही अशा विभागातून कनिष्ठ अभियंता देण्यात यावे. सर्व वॉर्डामध्ये मॅन पावर अभावी इस्टिमेट बनविलेले नाही. मागच्या वर्षी जी

परिस्थिती होती तीच परिस्थिती ह्या वर्षी आहे. अचानक का तुटवडा पडला.

शहर अभियंता : सर्व अभियंताचा कामाचा आढावा घेण्यात येवून जिथे आवश्यक असेल तिथे अभियंता पुरविण्यात येईल. सर्वच विभागाची मागणी आहे.

श्री.जोशी :जानेवारीच्या पहिल्या आठवडयापर्यंत आमचे इस्टिमेट तयार झाले पाहिजे ते कसे तयार करणे, हा प्रश्न प्रशासनाचा आहे.

शहर अभियंता : इस्टिमेट उपलब्ध स्टाफमधून तातडीने तयार करण्याच्या सुचना कार्यकारी अभियंतांना देण्यात येईल.

श्री.जोशी : सॉफटवेअर खरेदी केलेले आहे काही मिनीटात इस्टीमेट तयार करता येते.

श्री.अब्दुल रशिद मामु : ९ महिण्यात किती इस्टिमेट तयार झाले आहे.

मा.सभापती : इस्टिमेट बाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(वि.ड्रे.): महापालिकेत सॉफ्टवेअर उपलब्ध नाही.

श्री.संजय जोशी : करोडो रूपयांचे सॅाफ्टवेअर महापालिकेने खरेदी केलेले आहे परंतु महत्वाचे तिन मिनीटात एक इस्टिमेट तयार करणारे सॉफ्टवेअर खरेदी केलेले नाही. खरेदी करायला काय हरकत आहे.

श्री.सतिष कटकटे : एक महिण्यापासून वॉर्ड अभियंता नाही, वॉर्ड अभियंता काढण्याच्या पुर्वी तिथे वॉर्ड अभियंताची व्यवस्था करायला पाहिजे.

श्री.वसंत नरवडे पा. : आढावा घेण्यास वेळ द्या. जेथे कमी आहे तेथे देता येईल. स.सदस्य श्री.जोशी यांनी सांगितले सॉफ्टवेअर बद्दल माहिती द्यावी.

मा.सभापती : तिन मिनीटात इस्टिमेट तयार करण्याचे सॉफ्टवेअर उपलब्ध आहे. असे शहर अभियंता यांचे म्हणणे आहे.

श्री.संजय जोशी : आज एक निर्णय घेवू की, एक कनिष्ठ अभियंता इस्टिमेट तयार करण्यासाठीच संगणकावर बसविण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे : पाणी पुरवठा २ सिडको येथे १२ लाईनमन होते. काहींची बदली झालेली आहे. काही मयत झाले व काही सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या जागेवर एकही कर्मचारी दिला नाही. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडल्यामुळे वेळेवर पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे तिथे पाच ते सहा लाईनमन देण्याची व्यवस्था व्हावी. अवेळी पाणी पुरवठा झाल्यास कर्मचारी नसतात.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा द्यावा.

उप अभियंता(श्री.गायकवाड): पाणी पुरवठा विभाग-२ सिउको या विभागाशी संबंधीत आहे. स.सदस्यांचे काम सभा संपल्यानंतर तपासून घेतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: जेव्हा बजेटबुक तयार होते त्या बजेटबुकमध्ये जे अत्यावश्यक कामे आहेत त्याचे इस्टिमेट तयार पाहिजे. नगरसेवकांनी इस्टिमेट बनविण्याचे सांगण्याची गरज असू नये. स्वेच्छा निधीचे

अंदाजपत्रक का तयार असू नये. शिक्षणविभागात जसे एक वर्ष,सहा महिण्यासाठी करार पध्दतीने माणस घेतात, अशा पध्दतीने काही करता आलतर करण्यात यावे.

श्री.वसंत नरवडे : बांधकाम १,२ ला एक सॉफटवेअर, संगणक, वॉटर सप्लाय विभागास, ड्रिनेज विभागास एक सॉफटवेअर, संगणक देवून दोन कनिष्ठ अभियंताची नेमणूक करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे : जकात सुरू झालेली, मालमत्ता कर भरणा सुरू आहे परंतु विकास कामे होत नाही, मा.आयुक्तांनी नविण कामे,जुणे कामे थांबविण्यात यावे याबाबत काही पत्र दिलेले आहे काय? याचा खुलासा करण्यात यावे.

श्री.अब्दुल रशिद मामु : १० लाखाची कोणती कामे सुरू आहे?

श्री.मोहन मेघावाले : स.सदस्य श्री.रशिद मामु, श्री.सतिष कटकटे, श्रीमती जयश्री किवळेकर सर्वच सदस्यांची विकास कामाविषयी तक्रार आहे. विकास कामे थांबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी सांगतात की,मा.आयुक्तांचे पत्र असल्याकारणाने अपुर्ण कामे बंद आहेत. पेव्हर ब्लॉकचे कामाबाबत इस्टीमेट तयार करण्यात येवू नये म्हणून मा.आयुक्तांचे आदेश आहेत तर मग कुठले कामे करावयाचे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता : गेल्या वर्षीचे जुनी स्पिल वर्कचे कामे आहेत ती कामे करण्यास कसलीही अडचण नाही.

श्री.सतिष कटकटे : मा.आयुक्तांचे पत्र महत्वाचे आहे की, शहर अभियंता यांनी केलेला खुलासा खरा आहे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा केला आहे की, जुनी स्पिल वर्कची कामे करण्यास कुठलीही अडचण नाही.

श्री.संजय जोशी : माझ्या वॉर्डातील तीन वर्क ऑर्डर झालेली कामे बंद आहेत ते का सुरू होईना.

श्रीमती जयश्री किवळेकर: शहर अभियंता म्हणतात की कामे करण्यास अडचणी नाही तर मग कामे का होत नाही.

श्री.मोहन मेघावाले : कुठलेही कामे सांगीतले असता मा.आयुक्तांचे आदेश आहे असे सांगून अधिकारी कामे टाळतात.

कार्यकारी अभियंता(वि.ड्रे.) : मा.आयुक्तांचे ०२.०८.२००८रोजीचे पत्राचा सारांश असा आहे की, अत्यावश्यक कामे, रस्ता रूंदीकरण, दिवा बत्ती, ड्रिनेज,पाणी पुरवठयाशी संबधीत अत्यावश्यक कामे करू शकता. शेवटच्या परिच्छेदमध्ये असे आहे की, महापालिकेची आर्थीक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे सध्या सुरू असलेली कामे थांबविण्यात आलेली आहे, त्यामुळे आमच्या स्थरावर कन्फयुजन निर्माण होत आहे. मा.शहर अभियंता यांनी जी भुमिका मांडली आहे त्याप्रमाणे स्पिल वर्कची कामे तसेच वर्क ऑर्डर झालेले कामे करण्यात येतील.

श्री.सतिष कटकटे : शहर अभियंतांना रूजू होउन दिड महिणा झाला आहे,एक वर्षापासून आमचे कामे सुरू झालेली नाही.

मा.सभापती : शहर अभियंता यांच्या खुलासा केल्यानुसार स्पिलवर्कचे कामे करण्यात अडचणी नाहीत.

श्री.अब्दुल रशिद मामु : मागचे स्पिल ओव्हरचे काम बाकी आहे चालू स्पिल वर्कचे १० लाखाचे कामे करणार का? लहान गल्ल्यात गट्टू बसवणार नाही का.

श्री.मोहन मेघावाले : गट्टूचे कामे करूच नये म्हणून आदेशीत केले आहे.

श्री.वसंत नरवडे : मा.आयुक्तांचे पत्र असेल तर सर्वांना त्याची माहिती पाहिजे अंधारात ठेवून चालणार नाही. प्रत्येक नगरसेवक मा.आयुक्तांकडे जावून कामास मंजूरी आणू शकत नाही, मा.आयुक्तांनी हया ठिकाणी चाललेल्या प्रत्येक कामाचा आढावा घेवून कोणते कामे करायचे हे सांगायला पाहिजे. आज १९ लाखाचे टेंडर झाले.

श्री.अब्दुल रशिद मामु : छोट्या-छोटया गल्ल्यांची कामे बाकी आहे. रस्त्याचे कामे बाकी आहे.

श्री.मोहन मेघावाले : पेव्हर ब्लॉकचे काम बऱ्याच ठिकाणी चालू आहे. नागरीकांची ओरड असते की, बाजुच्या वॉर्डामध्ये पेव्हर ब्लॉकचे काम चालू आहे मग आपल्या इकडे का नाही. नागरीकांना उत्तर काय दयावयाचे. महानगरपालिकेच्या हॉलचे काम झाले. २% अनामत रक्कम भरलेली आहे.

मा.सभापती : या बाबत संबधीताशी बोलतो.

श्रीमती जयश्री किवळेकर:कार्यकारी अभियंत्यानी खुलासा केला की, १० लाखाचे कामे करण्यास सांगीतले त्यानंतर अतिमहत्वाचे, आमच्या वॉर्डात ड्रिनेज,वॉटर सप्लाय चा प्रॉब्लम नाहीत मग आम्ही १० लाखाचे कामे करायची नाहीत का? नगरसेवकांच्या प्राध्यान्यक्रमाला महत्व नाही. एप्रिलमध्ये १० लाखाचे तीन कामे अर्धवट स्थितीत थांबविले आहे. एजन्सीकडुन काम करून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे नसता सदरच्या एजन्सीला ब्लॅक लिस्ट करून दुसऱ्या एजन्सीला कामे देण्यात यावी. गार्डनचे अंदाजपत्रक परत येते.

मा.सभापती : याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : सर्व स.सदस्यांची जी भावना आहे तिच भावना मा.आयुक्तांची आहे. आर्थीक परिस्थितीमुळे कामांना कात्री लावण्याची गरज होती म्हणून कामे थांबविण्यात आली. आज आम्ही सांगीतल तरी गुत्तेदार काम करण्यास तयार नाही. वेगवेगळया वॉर्डात कामाची वेगवेगळी प्रायरोटि आहे. स.नगरसेवकांनी आमच्यापर्यंत संपर्क साधुन ती कामे अत्यावशक आहे किंवा नाही याचे अधिकार कार्यकारी अभियंताना दिलेले आहे त्यापध्दतीने नियोजन करून काम करण्यास काहीच हरकत नाही बजेटची अडचण आहे. लेखा विभागाची अडचण नसेल तर २०० कोटीची कामे मार्च पर्यंत

करण्यास तयार आहे. जुणे अत्यावश्यक कामे करण्यास अडचणी नाही. निधीची अडचण म्हणून कात्रण लावली होती.

श्रीमती जयश्री किवळेकर : माझ्या विषयाचा खुलासा झालेला नाही अर्धवट स्थितीत कॉन्ट्रॅक्टरनी सोडलेल्या कामाबाबत काय?

मा.सभापती : शहर अभियंताचे म्हणने आहे की, कामे कितीही करण्यास तयार आहे फक्त निधी उपलब्ध करून दयावा. जसा जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणात कामे होतील.

श्री.संजय जोशी : सदरचे काम प्रशासनाचे आहे त्यांनी वसुली करावी.

श्री.अब्दुल रशिद मामु : छोटे छोटे पेव्हर ब्लॉकचे कामे, फरशीचे कामे होतील का?

मा.सभापती : १० लाखाची कामे आपल्या गरजेनुसार होतील असा खुलासा शहर अभियंता यांनी केला आहे.

श्री.संजय जोशी : मा.आयुक्तांनी रॅम्केचा प्रस्ताव रद्द केल्यानंतरही रॅम्कोचे माणसे सर्वे करून गेले आहे.

श्री.सतिष कटकटे : रॅम्कोचा प्रस्ताव रद्द केलेला असतांना ते वॉर्डात येत आहे.

श्री.मोहन मेघावाले : संबधीत वॉर्डातील नागरीकांना व नगरसेवकांना माहिती आहे की अत्यावश्यक कामे कुठली आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : अधिकाऱ्यांना माहित नाही का.

श्री.अ. रशिद मामु : मा.आयुक्तांच्या पत्रानुसार कामे होणार आहे की, शहर अभियंता यांचे म्हणण्यानुसार.

श्री.मोहन मेघावाले : १० लाखाचे पेव्हर ब्लॉक बसविण्याचे इस्टिमेट परत करण्यात आले आहे.

मा.सभापती : १० लाखाचे कामे वॉर्डातील नगरसेवक सांगतील त्याप्रमाणे होईल असे परिस्थितीनुसार कामे होतील. मा.आयुक्तांचे पत्र आहे त्याबाबतीत शहर अभियंता खुलासा करीत आहे.

श्री.सिताराम सुरे : शहरात ९९ वॉर्ड आहे ५० वॉर्डाचा विकास झालेला आहे व ४९ वॉर्डाचा विकास झालेला नाही यावर १० लाखाचे निर्बंध कसे लावणार. ज्या वॉर्डाचा विकास झालेला नाही त्या वॉर्डाला जास्त निधी देण्यात यावे. करोडो रूपये कर भरणा केलेला आहे तिथे रस्ते, ड्रेनेज, लाईटच्या सुविधा नाही.

मा.सभापती :शासनाकडून ८.५० कोटी प्राप्त झालेले आहेत. त्यामधे आपल्या वॉर्डास प्राधान्य देण्यात येईल.

श्री.अ. रशिद मामू : मा.आयुक्त व शहर अभियंताचे बोलणे झाले असेल तर श्री.सोनवणे व श्री.पानझडे या दोन्ही कार्यकारी अभियंतांचे म्हणणे आहे. मा.आयुक्तांच्या पत्रावर कार्यवाही करू. त्यांनी शहर अभियंता यांनी म्हटल्यावर ऐकावे.

मा.सभापती : मा.आयुक्तांचे दुसरे पत्र आलेले आहे त्याचा प्रशासन खुलासा करीत आहे.

शहर अभियंता : गेल्या दोन तिन सभामध्ये विकास कामाबाबत चर्चा होत आहे मा.आयुक्तांशी याबाबत चर्चा झालेली आहे. मा.आयुक्तांचे लेखी

आदेश तसेच आताची व आठव्या महिण्याची स्थिती जाणून घेवू. कार्यकारी अभियंताशी आमचा चांगल्याप्रकारे समन्वय आहे. स.सदस्यांना दि.०५.०९.२००८चे पत्र लिहीले आहे. दि.२०.०८.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००८-०९ अर्थसंकल्पाबाबत सर्वकष चर्चा झाली, चर्चाअंती महानगरपालिकेची आर्थीक स्थिती लक्षात घेता चालू वित्तीय वर्षात अर्थसंकल्पात नमुद सर्वच कामे होणे शक्य नाही तथापी चालू वर्षातील तातडीचे व अत्यावश्यक कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे अशी विनंती केली आहे. स.सदस्यांनी प्राधान्य क्रमानुसार दिलेली यादी कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविण्यात यावी. संबधीत कार्यकारी अभियंतायांनी सदर यादीतील कामाची तातडी व निकड लक्षात घेवून अंदाजपत्रके तयार करणे बाबत कार्यवाही करावी. अश्या सर्व कामाकरीता १० लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

श्री.अब्दुल रशिद मामु : कामे का होत नाही याबाबत चौकशी व्हावी.

मा.सभापती : खालचे अधिकारी शहर अभियंता आणि मा.आयुक्त यांचेबाबत गैरसमज निर्माण करीत आहे.

श्री.सिताराम सुरे : माझे ३.५० करोड रूपये भरणा केली आहे तिथे मुलभूत सुविधा उपलब्ध नाही. दर वर्षी ५० लाख रूपये कर भरणा होते. अशा वॉर्डास प्राधान्य देणार नाही काय? ज्या वॉर्डाचा विकास झालेला नाही त्यांना मुबलक निधी उपलब्ध करून देण्यात यावे.

मा.सभापती : १० लाखाचे कामाबाबत गैरसमज होते, त्याबाबत शहर अभियंता यांनी स्पष्ट खुलासा केला आहे.

श्री.मोहन मेघावाले : सिडको, हडकोच्या वॉर्डामध्ये १०० टक्के वसूली होते त्यामुळे त्या ठिकाणी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दयावा. सिडको हडकोवर यापुर्वीही अन्याय झालेला आहे त्यामुळे ठोस निर्णय घेवून निधी उपलब्ध करून देण्यात यावे.

श्री.संजय जोशी : प्राधान्यक्रम ठरवण्याची गरज आहे, जेथून बेटरमेंट डेव्हलपमेंट चार्जेस मिळाले त्या पैशातून ताबडतोब कामे व्हायला पाहिजे. सिध्दार्थ उद्यानात शेड बांधण्याचे दोन वेळेस टेंडर नोटीस काढली ८० हजाराची टेंडर नोटीसवर ८ हजार जाहिरातीवर खर्च केला. याकडे लक्ष दयायला पाहिजे. शहानुरमियाँ दर्गा येथे लाईट लावण्याचा प्रश्न, स्मशानभुमी, कब्रस्थानाचे, रविवारच्या बाजारात लाईट लावण्याचे महत्वाचे कामे आहेत, तर प्राधान्याने कामे व्हायला पाहिजे.

मा.सभापती : शहानुरमियाँ दर्गा, रविवारच्या बाजाराचे इस्टिमेट बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.मोहन मेघावाले : सार्वजनिक गणपती विसर्जन विहिरी शेजारी हायमास्ट बसविण्यासाठी इस्टिमेट तयार आहे त्याबाबतही खुलासा व्हावा.

कार्य. अभियंता (वि.ड्रे.) : १० लाखाचे प्रायरोटीवर्कवर जर हायमास्ट घ्या तर हायमास्ट घेता येईल.

श्री.संजय जोशी : हा विषय १० लाखाचा नाही, शहानुरमियाँ दर्गा,रविवारचा बाजार,सार्वजनिक गणेश विर्सजन हा वॉर्डाच्या कामाचा विषय येतो का? हे वॉर्डाचे कामात येत नाही.

श्री.सतिष कटकटे : रविवारच्या बाजारात १५ लाख रूपये दरवर्षी येतो, सन २००६-०७ ला हायमास्टच्या इस्टिमेटला मंजूरी आहे तिथे आतापर्यंत हायमास्ट लावण्यात आलेला नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: अभियंत्याना माहिती पाहिजे की, कुठले काम वॉर्डात येते व कुठले केंद्रिय पध्दतीत येते.

कार्यकारी अभियंता (वि.ड्रे.) : धोरण ठरवून कामे करावी लागेल.

मा.सभापती : शासनाचा जो निधी आलेला आहे त्यातुन सदरचे कामे करता येईल.

श्री.वसंत नरवडे : सार्वजनिक ठिकाणच्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावी. अत्यावश्यक कामासाठी निधी वेगळा ठेवण्यात यावा. नगरसेवकांच्या प्राधान्याने कामे करण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : उत्पन्नाचे जिथे साधन आहे त्या ठिकाणाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

श्री.अ.रशीद मामु : शाहू महाराज येथील चौरस्त्याबाबत काय कार्यवाही केली.

मा.सभापती : हायमास्ट बाबत शासनाकडुन ८.५० कोटीचा निधी आलेला आहे त्यातुन हे कामे करण्यात यावी, श्री.सुरे यांच्याबाबतीत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : मा.आयुक्तांचे कार्यालयीन आदेश असे आहे की, असे निर्देशनास आले आहे की, शहरात मोठया प्रमाणात वेगवेगळी कामे मंजूर झाली आहेत तथापी याकामासाठी आर्थीक तरतुद उपलब्ध नाहीत त्यामुळे खालील कामाशिवाय इतर कामे हाती घेण्यात येवू नयेत या पार्श्वभुमीवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. १. रस्ता रूंदीकरण २. रस्त्याची देखभाल, दुरूस्ती करणे ३. नविन विकास योजने अंतर्गत नविण रस्त्यांची सर्व कामे करता येतात.

श्री.सतिष कटकटे : आठव्या महिण्यातील पत्र आहे की,रस्ता रूंदीकरण केल्यानंतर डांबरीकरण करा हे नगरसेवकांना दाखविण्यासाठी आहे की, कामे करण्यासाठी आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले : टि.व्ही.सेंटर येथील रस्ता अर्धवट स्थितीत आहे तो करणे गरजेचे होते,त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. रस्त्याच्या कामकाजास केव्हा सुरूवात होणार आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर : गजानन महाराज मंदिर ते जय भवानी नगरकडे जाणारा डिफर पेमेंटचा रस्ता अर्धवट स्थितीत गेल्या चार महिण्यापासुन आहे त्यावर काही निर्णय झाला आहे काय?

श्री.सिताराम सुरे :१५ दिवसांपूर्वी पाहणी केलेल्या रस्त्याबाबत निर्णय घेतलेला आहे काय?

शहर अभियंता : कोणते कामे करण्यास अडचणी आहे व कोणते कामे करू नये, दुसरे असे की, आर्थीक परिस्थितीप्रमाणे किती कामे करायची सदरच्या पत्रामध्ये कोणते कामे करायची यास कोणत्याही निधीची,स.सदस्यांची पत्राची गरज नाही व ती कामे वॉर्डानिहाय नाहीत.रस्ता रूंदीकरण, देखभाल, दुरूस्ती, दिवा बत्ती, पथदिवे, पाणी पुरवठा संबधी कामे, मलनिस:रण संबधीत कामे राज्य, केंद्र शासन अनुदानित कामे सरसकट करता येतील. डि. पी. प्लॅन मधील रस्ते करण्यास अडचण नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : गेल्या आठ महिण्याच्या दिलेल्या निर्णयावर प्रशासन किती गंभीर आहे ते समजून येईल,दैनंदिन कामासाठी स्थानिक स्वराज्य संस्था लाखो रूपये खर्च करते फक्त नियंत्रण नसल्याकारणाने नागरीकांची आरोग्याची हेळसांड होत आहे त्यास प्रशासन जबाबदार आहे, सर्वच सदस्य प्राथमिक सुविधा देण्यासाठी ओरड करत असतात मात्र साफसफाईवर पुर्णपणे दुर्लक्ष केले जाते. सिडको जी सुविधा देत होती तिच पध्दत महानगरपालिका सिडको हस्तांतरण झाल्यानंतर देत आहे. नोव्हेंबर महिण्यात जसे दहशतवादाने देशाला पोखरून काढले आहे तसेच औरंगाबादला डेंग्यु नावाच्या आजाराने त्रस्त केले आहे. डेंग्यु सदृष्य ११ पॉझिाटिव्ह ब्लडचे रिपोर्ट आलेले आहे. मलेरिया विभाग काय करत आहे, आरोग्य अधिकारी यांची जबाबदारी काय आहे. माझ्या हाय प्रोफाईल वार्डामध्ये एका पॉकीटमध्ये तिन रूग्ण सापडलेले आहे. प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे हि स्थिती आलेली आहे. डेंग्यु सदृष्य रूग्ण आढळल्यानंतर प्रशासनाने कुठल्या उपाययोजना केलेल्या आहेत.

श्री.वसंत नरवडे : औरंगाबादेतील सर्व ड्रिनेज लाईन चोकअप झालेल्या आहेत नाल्याच्या वरून पाणी वाहत आहे, ज्या ठिकाणी डासांचे निर्मुलन करण्याकरीता फवारणी केली जाते, ऑईलची स्प्रे मारण्याचे आपण खरेदी काय केली वितरण कश्या पध्दतीने केले, काम करण्याची जी व्यवस्था आहे ती सकाळी ७ वाजता ज्या ठिकाणावर डिस्ट्रिब्युशन आहे ते सकाळी ७ ऐवजी ९ वाजता येतात व फवारणी १० ते १५ लोकांच्या घरी केली जाते, कचरा कुडयांवर पावडर टाकली जात नाही. प्रत्येक फवारणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वतंत्र वही तपासण्यात यावी. डासांचे निर्मुलन करण्याकरीता फवारणी करतांना संपूर्ण वॉर्डात फवारणी केली पाहिजे कर्मचाऱ्यांकडून किमान आठ तास काम करून घेतले पाहिजे. औषध खरेदी आणि डिस्ट्रिब्युशन कशा पध्दतीने आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले : माझ्या वॉर्डात फवारणी दोन महिण्यांतुन एकदा केली जाते, आठवडयाला फवारणी केली पाहिजे. परंतु कर्मचारी मनमानी करत आहे. स्वामी विवेकानंद गार्डनची दुरावस्था झाली आहे पाण्याची व्यवस्था नाही, झाडे सुकत चालली आहे, कंपाऊडचे एंग्नल चोरीला गेलेले आहे, तसेच सलीम अली गार्डनचीही अवस्था बिकट झाली आहे, नाना नानी गार्डनची स्थितीही बिकट झाली आहे. महानगरपालिका शाळा व गोदावरी शाळाच्या मधील रस्त्यात नेहमी अंधार असतो गेल्या सहा महिण्यांपासून लाईट बंद आहेत त्या ठिकाणी घातपात होण्याची शक्यता आहे.

कार्य. अभियंता(विद्रे) : महानगरपालिका शाळा व गोदावरी शाळेच्या मधील रस्त्यावरील लाईट ६ वेळेस दुरूस्ती केली आहे. त्यांना माहित आहे. तेथील लाईट मुद्दाम बंद केली जाते, केबल चोरीला जाते. पुन्हा दोन दिवसांत लाईट सुरू करण्याची व्यवस्था केली जाईल व स.सदस्यांची तक्रार दुर केली जाईल.

मा.सभापती : डेंग्युबाबत आरोग्य अधिकारी यांनी सविस्तर खुलासा सादर करावा.

श्रीमती सफीया मोमीन : माझ्याही वॉर्डात साफसफाई होत नाही, फवारणी नाही.

प्र.आरोग्य वै.अधि. : स.सदस्या श्रीमती जयश्री किवळेकर यांच्या वॉर्डात डेंग्यु सदृष्य रूग्ण आढळून आलेले आहे. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज कडून रिपोर्ट आलेला आहे. सदरील केस पुण्याच्या नॅशनल इस्टिटयुट येथून पॉझिटिव्ह येत नाही तोपर्यंत डेंग्यु पॉझिटिव्ह म्हणत नाही, जरी हा संशयीत असला तरी डेंग्यु धरूनच सर्व उपाययोजना केलेल्या आहेत. रॅपिड फिव्हर सर्व्हे सुरू केलेला आहे आपल्याकडे ज्या काही सुविधा आहेत त्यासर्व प्रकारे सुविधा पुरविल्या आहेत.अजून कुठले रूग्न आढळून येतात का? याचे सर्व्हे सुरू आहे. आलेल्या रूग्णांचे सॅम्पल पुन्हा पुण्याला पाठविण्यात येत आहे. बायलॉस्टीचचा चार्ज श्री.बोराडे यांचेकडे देण्यात आलेला आहे, त्यांच्यामार्फत फवारणी होत असते. फवारणी मध्ये सुधारणा करण्याची गरज आहे लेबरची संख्या अपूरी आहे ती वाढवली पाहिजे. फवारणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुचना देण्यात आल्या आहेत की, स.सदस्यांचे फोन नंबर व नागरीकांचे सहयासोबत फोन नंबर फवारणी केल्यानंतर आणावेत जेणे करून नागरीकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून फवारणी व्यवस्थित झाली की नाही याची सत्यता समोर येईल. समन्वय समिती म्हणून जिल्हा हिवताप संचालक,मेडिकल कॉलेज व आपली एक बैठक ठेवण्यात आली आहे. व शासन स्तरावर अजून काय उपाययोजना करण्यात येईल याची माहिति घेवून उपाययोजना करण्यात येईल.

श्रीमती जयश्री किवळेकर : मेडिकल कॉलेजचा रिपोर्ट आला तो चुकीचा आहे काय? महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने काय उपाययोजना आखल्या आहेत. जनजागृती म्हणून काय केली आहे.

श्री.संजय जोशी : सदरील काम हे महानगरपालिकेचे आहे.

आरोग्य अधिकारी :मलेरीया विभागामार्फत पूर्ण इलाज केलेला आहे. श्री.बोराडे याबाबत संपूर्ण माहिती सांगतील.

श्रीमती जयश्री किवळेकर : श्री.बोराडे यांचेकडे काय म्हणून चार्ज दिलेला आहे मेडिकल ऑफिसरकडे हा चार्ज का देण्यात आला नाही. त्यांना औषधीचे ज्ञान आहे काय? ऑषधीचे प्रमाण किती पाहिजे फॉगींग किती दिवसाला करायला पाहिजे.

श्री.बोराडे : एकुण महानगरपालिकेकडे २७ फॉगींग मशीन आहे त्यापैकी २२ चालू अवस्थेत आहे व ०५ बंद अवस्थेत आहे. वार्ड-अ ०४ मध्ये वार्ड-ब ०२ वार्ड-क ०४ वार्ड-ड ०४ वार्ड-ई ०४ वार्ड-फ ०४ आणि ०३ रिझर्व मध्ये ठेवले आहे. २१ कर्मचारी धूर फावारणीसाठी आहेत.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको हडको भागात किती मशीन आहेत व कोणत्या औषधींचा वापर होतो.

श्री.बोराडे : वॉर्ड-ब व ई मध्ये प्रत्येकी ०२ मशीन आहेत.

श्री.नारायण कुचे : सकाळी माझ्या परिसरात दोनच मशीन आणल्या जातात.

श्रीमती जयश्री किवळेकर : माझ्या वॉर्डात ३ डेंग्युचे रूग्ण आहेत. स्वच्छतेच्या कामात सुधारणा झाली. या वॉर्डात एकच फॉगींग मशीन आहे. ती आठवड्याला फक्त एकदाच तिन तास चालते. जे एस.आय. आहे त्यांच्यावर कुणाचेच नियंत्रण नसते त्यांना निवडणुकीचे काम लागले आहे.

मा.सभापती : कोणते औषधाची फवारणी केली जाते त्याचे नाव सांगण्यात यावे.

श्री.अब्दुल रशिद मामु : विभाग प्रमुख कुठे गेले आहेत.

श्री.बोराडे : गर्व्हनमेंटची पोस्ट आहे ती सध्या रिक्त आहे. दहा लिटिर पाण्यात २० एम.एल. बिटॅक्स टाकण्यात येते. त्याद्वारा डासांचे अळया, अंडे यांचा नायनाट होतो. दहा लिटिरच्या पाण्यामध्ये २० एम.एल.बिटॅक्स टाकण्यात येते. व फॉगींग आठवडयातुन एकदा केली जाते.

श्री.संजय जोशी : नाल्यांवर ट्रायल बेसीसवर औषध फवारणीसाठी ट्रॅक्टर घेतले आहे परंतु ऑईल वापरतच नाही,

श्री.बोराडे : ऑईलचा पुरवठा शासनाकडुन झालेला नाही.

श्री.संजय जोशी : गेल्या वर्षापासून ऑईलचा पुरवठा झालेला नाही. ऑईलची फवारणी केल्यावर पाण्याच्या वरती एक लेअर तयार होउन डासांना ऑक्सीजन मिळत नाही व ते मरून जातात, त्यामुळे डासांचे निर्मुलन करण्याकरीता एक ॲक्शन प्लॅन तयार करावा

जेणे करून संपूर्ण शहरात फवारणी करण्यात यावी. फॉगींग सुर्यादयापुर्वी झाले पाहिजे. महानगरपालिका टेक्निकली सक्षम आहे तसेच ऑईलची खरेदी महानगरपालिकेने करावी.

श्री.अब्दुल रशिद मामु : गुत्तेदारांची एक बैठक बोलावण्यात यावी.

मा.सभापती : शहर अभियतांना घेवून त्यांची एक बैठक घेवू.

श्री.संजय जोशी : ऑईल खरेदी तसेच जे जे औषध आपल्याकडे उपलब्ध नाहीत ते प्रायोरिटीवर खरेदी करण्यात यावे. आरोग्य विभागाच्या वेगळया फंडमधून तरतुद करण्यात यावी.

सौ.अल्पा जैन :वॉर्ड ड मध्ये छोटया ऑटो कचरा उचलण्यासाठी पाठविणार होते ते अद्यापपर्यंत पाठविण्यात आले नाही.

मा.सभापती :अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा द्यावा.

अति.शहर अभियंता :मागच्या बैठकीत रिक्शा बाबत विषय काढला होता, पुर्वीच्या रिक्शा वॉर्ड अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात लावून घेतल्या होत्या. मंजुरी अद्याप अप्राप्त आहे. रिक्शावाल्याचे गेल्या तिन महिन्याचे पेमेंट बाकी असल्यामुळे तो काम करायला तयार नाही.

मा.सभापती :महानगरपालिका एवढी लाचार झाली आहे का की, कचरा उचलण्यासाठी दोन ॲटो रिक्शा लावू शकत नाही. स्थायी समितीच्या निर्णयाला आपण मानत नाही तर आपणाला काय बोलावे.

श्री.सतिष कटकटे :प्रभाग ड खाजगीकरण बंद केले, महापालिकेतर्फे साफसफाई चालू केली आहे.

अति.शहर अभियंता :सहा टिप्पर देण्यात आले आहे.

मा.सभापती :रिक्शा बाबत स.सदस्यांनी मागणी केली होती त्याबाबतीत काय झ ााले प्रशासनाने खुलासा द्यावा.

श्री.सतिष कटकटे :आरोग्य अधिकाऱ्यांनी वॉर्ड अधिकाऱ्यांना सांगण्यात आले होते की, तुमच्या अधिकारात तीन रिक्शा लावण्यात येवून कचरा उचलण्यात यावा.

अति.शहर अभियंता :पेमेंट न केल्यामुळे रिक्शाचालक कामावर येण्यास तयार नाही.

श्री.सतिष कटकटे :त्यांचे पेमेंट कोण देणार.

अति.शहर अभियंता :सदरची संचिका वॉर्ड अधिकाऱ्यांकडे देण्यात आली आहे की त्यांनी मा.आयुक्तांची मंजुरी घेवून पेमेंट देण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे :वॉर्ड अधिकाऱ्यांना तसे अधिकार आहेत काय?

अति.शहर अभियंता :वॉर्ड अधिकाऱ्यांना अधिकार दिलेले आहेत.

श्री.सतिष कटकटे :टोलवाटोलवी केली तर साफसफाईचे कामे कसे होणार महिन्याला १८ लाख रूपये खर्च झाले आहे व एक लाख रूपये खर्च करीत नाही, सदरच्या ठिकाणी साफसफाई करणेसाठी सामान उपलब्ध नाही.

मा.सभापती : वॉर्ड अधिकाऱ्यांच्या अडचणी आहेत का? नियंत्रण अधिकारी कोण आहेत.

श्री.वसंत नरवडे :उपआयुक्त यांनी संचिका मंजुर करून आणली पाहिजे. वॉर्डावर ज्यांचे नियंत्रण आहे त्यांनी मंजूरी आणावी.

श्री.संजय जोशी : उद्याच्या उद्या लावावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मा.आयुक्तांच्या मंजुरीची काय गरज आहे. आपणांस अधिकार दिले आहेत.

उपआयुक्त(म) :उपआयुक्त(म) नियंत्रण अधिकारी नसुन श्री.जावरे घनकचरा प्रमुख हे नियंत्रण अधिकारी आहेत.

श्री.नारायण कुचे :मा.आयुक्त म्हणुन श्री.घुगे हे बैठकीत बसतात त्यांनीच मंजूरी आणली पाहिजे.

उप आयुक्त(महसुल) : वॉर्ड ऑफीसरचे काम आहे. साफसफाईवर नियंत्रण उप आयुक्त(म) यांचे नाही. श्री.जावरे यांचे आहे व विभाग प्रमुख अतिरिक्त शहर अभियंता आहेत.

श्री.वसंत नरवडे :साफसफाईच्या बाबतीत हलगर्जीपणा करून चालणार नाही श्री.जावरे यांच्याकडुन सदरचा विभाग काढुन टाकण्यात यावा व एक उपआयुक्तांना त्या ठिकाणी नेमण्यात यावे. मा.सभापती यांचे आदेशाचे पालन होत नाही. माझी महानरपालिका म्हणुन अधिकाऱ्यांना वाटत नाही.

श्री.सतीश कटकटे : प्रभाग-ड चा विषय आहे. टोपले, फावडे, हातगाड्या नाहीत.

उप आयुक्त(म.) : लायझन ऑफीसर नेमले आहे.

मा.सभापती :मा.आयुक्तांची मंजूरी श्री.घुगे हे आणुन देतील, एकमेंकावर टाळाटाळ करून चालणार नाही, आपल्याकडे तीन एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर आहेत त्यांचे खांदेपालट करा त्यांचे विभाग बदल करा, मी मा.आयुक्तांना बोलतो, प्रकरण फक्त १ लाखाचे आहे दोन ॲटो रिक्शा लावू शकत नाही. तीन कार्यकारी अभियंतांचे खांदेपालट करा.

अति.शहर अभियंता : काम करून घेतले जाते. मला अधिकार नाही. मा.आयुक्तांचीच कार्योत्तर मंजुरी घेतली जाते.

श्रीमती किवळेकर :अधिकारी अशी टोलवाटोलवीचे उत्तरे देत असतील तर काहीच निष्पन्न होणार नाही.

मा.सभापती :स्थायी समितीने वारंवार निर्देश देवूनही दोन रिक्शा लावू शकत नाही.

श्री.नारायण कुचे :दुपारी जो कचरा उचले जात होता तोही आता उचलले जात नाही.

श्री.वसंत नरवडे :लायझनींग ऑफिसरचे यावर नियंत्रण नाही. अशा अधिकाऱ्यांची काहीही गरज नाही. जबाबदारी उप आयुक्तांवर टाकावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: सर्व अधिकाऱ्यांना खर्च करण्याचे अधिकार दिले आहेत. ते टाळाटाळ करतात. ज्यांना जे अधिकार दिलेले आहेत ते त्यांनी वापरले पाहिजे.वापरत नसेल तर जो वापरतो त्याला द्यावे. त्यांनी लावावे. लिगल इल्लीगल नंतर पाहावे. प्रथम पेमेंट करावे, नंतर

चौकशी करावी. दोन दोन महिने १ लाखाचे पेमेंट होत नसेल तर हे योग्य नाही. पेमेंट ताबडतोब करावे.

श्री.वसंत नरवडे :लायझनींग ऑफिसर पेक्षा उपआयुक्त(म) नेमुन त्यांच्याकडुन कामे करून घ्यावी. तिन दिवसांत सदरचा प्रश्न सोडविण्यात यावा. अन्यथा उपोषणास बसावे लागेल.

मा.सभापती :कचरा हातळणी बाबतचे काम श्री.जावरे बरोबर करीत नाही तसेच श्रीमती अल्पा जैन व वॉर्ड ड मधील सर्व सदस्यांनी एवढी महत्वाची चर्चा करून त्याची दखल घेण्यात येत नाही. रिक्शावाल्याचे पेमेंट उपआयुक्त (म) यांनी जातीने लक्ष घालून त्यांचे पेमेंट तिन दिवसात देवून रिक्शा तिन दिवसाच्या आत सुरू करावे आणि याबाबत कार्यकारी अभियंताही टाळाटाळ करीत असल्याचे दोन वेळेस लक्षात आलेले आहे. म्हणून आपल्याकडे तिन एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर आहेत त्यांचे खांदेपालट करण्याची कार्यवाही मा.आयुक्तांनी त्वरीत करण्यात यावी. डेंग्युचे ११ रूग्ण आढळले. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, उप आयुक्त (म) यांनी संपर्क करून ॲक्शन प्लॅन तयार करावे व कार्यवाही करावी व अंमलबजावणी करावी. उप आयुक्त(म) व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जे औषधी लागतील ते ताबडतोब खरेदी करावी व कलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील सभेत द्यावी.

श्री.कचरू मोरे :भांडार विभागाला जे Direct Purchasing चे अधिकार प्रशासनाने दिलेले आहे Purchasing करतांना स्थायी समितीची मंजुरी घेतली जाते, १९७० च्या जी.आर. प्रमाणे जी खरेदी केली जाते ती भांडार विभाग प्रमुख व लेखाधिकारी यांच्या संमतीने केली जाते, १९०५ ते ५.११.२००८ पर्यंत भांडार विभागाने जी जी खरेदी केली आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

सहा.आयुक्त-१ :सदर जी.आर. व खरेदी संबधी माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे :सन १९९२ मध्ये हा जी.आर. रद्द झालेला आहे.

श्रीमती सफिया मोमीन: फुले नगर ते वेदांत नगर रोडवर टपऱ्या लावण्यात येत आहे तिथे पूर्वीच्या टपऱ्या आहेत. पूर्ण शहराच्या टपऱ्या हटवून तिथे लावण्यात येणार आहे तिथे एवढी जागा आहे काय? परिवार हॉटेलचे मालक स्वत:हून तोडफोड करत होते. तर ४० ते ५० हजार रूपये खर्च करून तोडफोडीची काय गरज होती.

मा.सभापती :पुढील बैठकीत प्रशासनाने खुलासा सादर करावा

श्री.मोहन मेघावाले :स्वामी विवेकानंद गार्डन, सलीम अली सरोवर गार्डन याबाबतीत खुलासा मिळाला नाही.

मा.सभापती :सदरचा विषय श्री.भडके यांचेकडे आहे ते बैठकीत हजर नसल्याने पुढील बैठकीत सदरचा विषय घेण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे :मागील बैठकीतील चर्चानुसार दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र वॉर्ड अधिकाऱ्यांमार्फत इश्यु करावेत म्हणून सांगण्यात आले परंतु अजुन पर्यंत प्रमाणपत्र इश्यु झालेले नाहीत.

प्रकल्प संचालक(श्री.सुर्यवंशी): मागच्या मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे वॉर्ड अधिकारी यांना प्रमाणपत्र वितरीत केलेले आहे. फक्त वॉर्ड-ड चे प्रमाणपत्र इश्यु झालेले नाही. अर्ज घेवून वाटप करण्याचे काम सुरू आहे.

मा.सभापती : लोकांना सुचना दिलेली आहे काय?

प्रकल्प संचालक : अर्ज प्राप्त होत आहे त्यानुसार वाटप सुरू आहे.

श्री.मोहन मेघावाले :ज्या त्या वॉर्डाच्या नगरसेवकांकडे अर्ज वाटप करणेसाठी देण्यात यावे. नगरसेवकांना माहिती होईल की, कुठला नागरीक दारीद्र्य रेषेखाली आहे.

श्री.कचरू मोरे : जे लोक प्रमाणपत्राची उहापोह करतात त्याला बंधन घालण्यासाठी अर्जावर नगरसेवकांचे शिफारसपत्र सादर करण्याचे बंधन घालण्यात यावे जेणे करून आर.सी.सी. बिल्डींग बांधणारे, सर्व्हिसला आसणारे, माजी नगरसेवकांचे नावे दारीद्र्यरेषेखाली आले आहे. नगरसेवकांची शिफारस घेतली तर नगरसेवकांना माहिती मिळेल. माझ्या वॉर्डात माजी नगरसेवक श्री.प्रकाश शिवराम जावळे यांचे नाव यादीत आलेले आहे.

श्री.नारायण कुचे :सदरची बाब गंभीर स्वरूपाची आहे.

मा.सभापती :सदरची बाब गंभीर आहे. याबाबत संपूर्ण चौकशी करून माजी नगरसेवक,आर.सी.सी. बिल्डींग असणारे किंवा एखादे कर्मचारी,अधिकारी यांचे नांव वगळण्यात यावे. उप आयुक्त(प्र) चौकशी करतील.

श्री.कचरू मोरे : नगरसेवकांचे शिफारसपत्र त्या अर्जावर असावी.

मा.सभापती : नियमानुसार असेल तर नगरसेवकांची शिफारसपत्र घेण्यात यावे.

श्री.संजय जोशी :संपूर्ण चौकशी करावी लागेल, सदरच्या अधिकारामधून मला वगळण्यात यावे.

मा.सभापती :याबाबत महाराष्ट्र शासनाचे आदेश पत्र असे आहे की, कोणत्याही नागरीकांचे गैरवाजवी नाव आले असेलतर तक्रार करून नाव वगळता येते. नगरसेवकांनी प्रमाणीत करणे शासनाच्या आदेशात नाही.

**<u>विषय क्र. १५४ :</u>**

**दिनांक १५/११/२००८** (का.प.क्र.**१५**), रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १५/११/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५५ :**

(दि.१३.५.२००८ च्या स्था.स. सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.२० )

दिनांक ५-२-२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.३२६ मधील मुद्दा क्र. १ हा स्थगित ठेवण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर प्रस्ताव ठेवणेसाठी सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार रस्ता रूंदीकरणाबाबत नगर रचना विभागाचा अभिप्राय घेवून खालील प्रमाणे फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. महानगरपालिका हद्दीतील विविध भागातील अतिक्रमण विभागातील काढण्यात आलेल्या टपरी धारकांना जागा देण्यासाठी एकनाथनगर भागात फुलेनगर टी पॉइंट ते वेदांतनगरकडे जाणाऱ्या २४ मीटर रस्त्यालगत व शासकीय तंत्रनिकेतन वस्तीगृहाच्या कुंपण भिंतीलगत स्टॉल धारकांस २.४ x २.७ मीटर म्हणजेच ६.४८ चौ.मी. क्षेत्राची जागा भाड्याने द्यावयाची झाल्यास सन २००७ च्या सिध्द शिघ्र गणकानुसार रू.७०/- प्रती चौ.मी. दर आकारण्यात येईल. तरी या दरास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच सदर जागा देताना एक वर्षाचे भाडे आगाऊ भरणा करून घेणे व अनामत रक्कम रू.१०००/- प्रती चौ.मी. आकारण्यात येईल. नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर भाड्या व्यतिरिक्त भरावा लागेल, शिवाय सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावा लागेल.

२. दिनांक ५-२-२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.३२६ मधील मुद्दा क्र.२, ३ व ४ हे महानगरपालिकेने शाळेसाठी खाजगी व्यक्तीकडून जागा भाड्याने घेण्याबाबतचे आहे. त्याचे भाडे ठरविण्यासाठीचे भाडे दर निश्चितीसाठी मा.स्थायी समिती समोर सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

०१. मोहल्ला विठ्ठलनगर येथील खाजगी व्यक्ती श्री. अण्णासाहेब दौलतराव राऊत यांच्या मालकीच्या दोन खोल्या भाड्याने घेतल्या आहेत. सदरील दोन खोल्यांचे भाडे खालील प्रमाणे दर्शविण्यात येते.

अ) खोलीचे लोडबेरींग मध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफह १८.८८ चौ.मी. असून रू.४७/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे संबंधीतास देणे योग्य राहील.

ब) खोलीचे आर.सी.सी. कॉलममध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ ९.४५ चौ.मी. व खोलीचे चटई क्षेत्र ७.८७ चौ.मी. असून रू.६६/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे एवढे येते.

०२. मोहल्ला बेगमपुरा येथील खाजगी व्यक्ती श्री.अलीम खान यासिन खान यांचेकडून महानगरपालिकेच्या शाळेसाठी खोल्या भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.३९/- प्रती चौ.मी. प्रती माह संबंधीतास देणे योग्य राहील.

०३. मौजे पडेगांव येथील खाजगी व्यक्ती श्रीनंद छोटीराम वाणी यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेसाठी भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.५३/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे देणे योग्य राहील.

पाणीपट्टी व मालमत्ता कर संबंधीत मालकास भरावा लागेल व विद्युत देयक महानगरपालिका भरेल. तरी वरील भाडे दर प्रती माह प्रति चौ.मी. आकारणे योग्य.

करीता सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.कचरू मोरे :एकनाथनगर भागात फुलेनगर टी पॉइंट ते वेदांतनगर रोडच्या एका बाजूला आय.टी.आय व दुसऱ्या पॉलटेक्निक कॉलेज आहे हा भाग सायलेन्स झोन मध्ये येतो. त्यामुळे टपऱ्या तिथे लावण्यात येवू नये.

श्री.संजय जोशी :डी.पी.रोडवर टपऱ्या लावू नये म्हणून न्यायालयाचे आदेश आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक १५५ मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १. महानगरपालिका हद्दीतील विविध भागातील अतिक्रमण विभागातील काढण्यात आलेल्या टपरी धारकांना जागा देण्यासाठी एकनाथनगर भागात फुलेनगर टी पॉइंट ते वेदांतनगरकडे जाणाऱ्या २४ मीटर रस्त्यालगत व शासकीय तंत्रनिकेतन वस्तीगृहाच्या कुंपण भिंतीलगत स्टॉल धारकांस २.४ X २.७ मीटर म्हणजेच ६.४८ चौ.मी. क्षेत्राची जागा रू.७०/- प्रती चौ.मी. दराने व अनामत रक्कम रू.१०००/- प्रती चौ.मी. आकरून नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर भाड्या व्यतिरिक्त शिवाय सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणी करून भाड्याने देण्यास मंजुरी देण्यात येते.

१. मोहल्ला विठ्ठलनगर येथील खाजगी व्यक्ती श्री. अण्णासाहेब दौलतराव राऊत यांच्या मालकीच्या दोन खोल्या खोल्यांसाठी खालीलप्रमाणे भाडे निश्चितीस मंजुरी देण्यात येते.

अ) खोलीचे लोडबेरींग मध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ १८.८८ चौ.मी. असून रू.४७/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे संबंधीतास देण्यास मंजुरी देण्यात येते.

ब) खोलीचे आर.सी.सी. कॉलममध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ ९.४५ चौ.मी. व खोलीचे चटई क्षेत्र ७.८७ चौ.मी. असून रू.६६/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

२. मोहल्ला बेगमपुरा येथील खाजगी व्यक्ती श्री.अलीम खान यासिन खान यांचेकडून महानगरपालिकेच्या शाळेसाठी भाडेतत्वावर घेतलेल्या खोल्यांसाठी रक्कम रू.३९/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे संबंधीतास देण्यास मंजुरी देण्यात येते.

३. मौजे पडेगांव येथील खाजगी व्यक्ती श्रीनंद छोटीराम वाणी यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेसाठी भाडेतत्वावर घेतलेल्या जागेसाठी रक्कम रू.५३/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

पाणीपट्टी व मालमत्ता कर संबंधीत मालकास भरावा लागेल व विद्युत देयक महानगरपालिका भरेल या व इतर अटी-शर्तीनुसार संबंधीतास भाडे अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **प्रभाग-क** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१९,२६,४२२/- चे तयार करण्यात आले आहे. सदर

कामाचा खर्च सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती-पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली असून मा.आयुक्त यांनी सदर प्रस्तावास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,२६,४२२/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.वसंत नरवडे : पॅचवर्कद्वारे दुरूस्तीसाठी रूपये १९,२६,४२२चे तयार केले आहे इतर वॉर्डासाठीही तशी तरतुद केली आहे काय?

मा.सभापती :संपूर्ण पॅचवर्कचे कामे करण्यात येणार आहे.

श्री.वसंत नरवडे :ड वॉर्डासाठी ५० लाखाचे पॅचवर्कसाठी लागणार आहे तेवढी खर्च करणार आहे काय?

मा.सभापती :विषय क्रमांक १५६ मंजूर करण्यात येतो तसेच सर्वच वॉर्डाचे पॅचवर्कचे प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावे, मागील बैठकांमध्ये दोन वॉर्डाचे प्रस्ताव मंजूर केलेले आहे

श्री.वसंत नरवडे :मा.महापौरांच्या वार्डाला कामासंदर्भात जसे प्राधान्य दिले जाते तसेच स्थायी समितीच्या सदस्यांच्या वार्डाला देण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे :पॅचवर्क करतांना डांबर खडी टाकून पॅचवर्क करतात की, मुरम टाकल्या जातो.

अति.शहर अभियंता :मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती व पदाधिकारी यांनी जाहिर केले की, शहरातील सर्व रस्ते पॅचवर्क जानेवारी अखेर पुर्ण करण्यात येईल. त्यानुसार प्रस्ताव आला आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या वर्धापनाच्या दिवशी जाहीर केले होते.

श्री.सिताराम सुरे :एन-८ एम जी एम ते बजरंग चौक येथे मुरूम टाकण्यात आला आहे.

अति.शहर अभियंता :वॉर्ड ड चे रस्त्याचे पॅचवर्कचा प्रस्तावावर स्वाक्षरी झाली असून पुढील बैठकीत ठेवण्यात येईल. पॅचवर्कसाठी हॉट मिक्स प्लॅन्ट जो तयार माल येतो तो वापरण्यात येतो. एन-८ बाबत जो स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला तो बरोबर आहे, मागील १५ दिवसांपूर्वी कामे सुरूच नसल्याने खड्डे मोठया प्रमाणात असल्याने तिथे मुरूम टाकून तात्पुरत्या स्वरूपात भरले आहे.

मा.सभापती :८ डिसेंबर रोजी वर्धापनाच्या दिवशी मा.महापौरांनी घोषित केले की, सर्वच वॉर्डातील पॅचवर्कचे कामे मार्चपूर्वी करावयाचे आहे म्हणून विषय क्रमांक १५६ मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-क** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,२६,४२२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.८९ प्रशांतनगर, प्रतापनगर, म्हाडा कॉलनी व ज्योतीनगर अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१३,९३,५७४/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा विक्री झाल्या होत्या, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत पाच निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २८.९५% जास्त दराने |
| २. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३०.००% जास्त दराने |
| ३. | चंद्रम्मा एन. आशन्ना | अं.प.दरापेक्षा ३२.००% जास्त दराने |
| ४. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३५.००% जास्त दराने |
| ५. | एम. ए. सिद्दीकी | अं.प.दरापेक्षा ३७.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांच्या निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.९५% जास्त असे होते. तथापी वाटाघाटी नंतर सदरील दर १९% जास्त मान्य करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. करीता आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची १९% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८९ प्रशांतनगर, प्रतापनगर, म्हाडा कॉलनी व ज्योतीनगर अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधार आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १५८ :**

उप आयुक्त (महसूल) हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, भांडार विभागात इतर विभागाकडून प्राप्त झालेले जुने इलेक्ट्रीकल्स/इलेक्ट्रॉनिक साहित्य (फॅक्स मशीन, इलेक्ट्रॉनिक टाईपरायटर, वॉटर कुलर, एअर कुलर इ.) तसेच जुने उपयोगात न येणारे फर्निचर साहित्य (टेबल, खुर्च्या इ.) पडून आहेत. सदर साहित्यामुळे बरीच जागा अडलेली असून, सदरील साहित्य उपयोगात येणारे नाही.

याकरीता सदरील साहित्याचे तांत्रिक विभागाकडून मुल्यांकन करून घेण्यात आलेले असून, ते रू.६४,२१०/- एवढे आलेले आहे. प्रकरणांत सदर साहित्य लिलाव पध्दतीने विक्री करण्यासाठी परवानगी देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : महानगरपालिकेतील संपूर्ण भांगार लिलावात काढण्यात यावे. पाणी पुरवठा विभागाकडील भंगार साधारणतः २.५० ते ३ कोटीचे आहे.

मा.सभापती : महानगरपालिकेतील कार्यालयात तसेच इतर ठिकाणी जे काही भंगार आहे ते सर्वच्या सर्व भंगार विकण्यात येवून परिसर स्वच्छ करण्यात यावा. तसा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भांडार विभागात पडून असलेले जुने इलेक्ट्रीकल्स/इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच जुने उपयोगात न येणारे फर्निचर इत्यादी साहित्य लिलाव पध्दतीने विक्री करण्यास परवानगी देण्यात येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो त्या ठिकाणी मार्बल बसविणे आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्पातील पान क्र.W-५५ अ.क्र.९ वरील प्रभाग क्र.३२ बुढ्ढीलेन जामा मस्जीद येथील कब्रस्तानसाठी दफनविधीच्या जागेवर पेव्हर ब्लाक बसविणेसाठी रू.१२.७५ लक्षची तरतुद उपलब्ध असून मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांनी त्यांचे स्वेच्छा निधीतून रक्कम रू.४.८५ लक्ष निधी उपलब्ध करून दिलेला आहे. अर्थसंकल्पातील तरतुद व मा.सभापती यांचे स्वेच्छा निधीतील उपलब्ध रक्कम असे एकत्रीत रू.१७,६०,०००/- चे काम जामा मस्जीद परिसरातील दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") होतो त्या ठिकाणी मार्बल बसविणेचे काम करता येईल. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान, दत्ताभाऊ पाथ्रीकर (सदस्य, स्थायी समिती)
अनुमोदक : मोमीन सफीया फिरदौस, संजय जोशी, सिताराम सुरे (सदस्य, स्थायी समिती)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो त्या ठिकाणी मार्बल बसविण्याचे कामासाठी अर्थसंकल्पातील पान क्र.W-५५ अ.क्र.९ वरील प्रभाग क्र.३२ बुढ्ढीलेन जामा मस्जीद येथील कब्रस्तानसाठी दफनविधीच्या जागेवर पेव्हर ब्लाक बसविणेसाठी रू.१२.७५ लक्षची तरतुद आणि मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांनी त्यांचे स्वेच्छा निधीतून रक्कम रू.४.८५ लक्ष निधी उपलब्ध करून दिलेला निधी असे एकत्रीत रू.१७,६०,०००/- चे काम जामा मस्जीद परिसरातील दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") होतो त्या ठिकाणी मार्बल बसविण्यास मंजुरी देण्यात येते. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी वापरावयाच्या Poly Aluminium Chloride Powder (PAC) चा पुरवठा करण्यासाठी रू.४४,३१,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२८८ दि.२०/९/२००८ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

वार्षिक पी.ए.सी. पावडर पुरविण्यासंबंधी ई-निविदा विभागामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदाप्रक्रिये अंतर्गत या पुरवठ्या करीता एकुण तीन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी दर भरलेल्या एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एस.व्ही.एस. केमीकल कॉर्पोरेशन, पुणे | - | रू.२८,६००/- प्र. मे.टन |
| २) पार्श्व असोसिएटस्, नागपुर | - | रू.२९,८००/- प्र. मे.टन |
| ३) फोनिक्स केमीकल्स, औरंगाबाद | - | निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्र, प्रमाणपत्र नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

प्राप्त दरांपैकी एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन, पुणे यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रू.२८,६००/- प्र. मे.टन असे आहेत. वाटाघाटीअंती एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन, पुणे यांनी सुधारीत दराचे पत्र दिले असुन सुधारीत दर हा रू.२७,०००/- प्र. मे.टन असा दिलेला आहे. या दराने खरेदी केल्यास पुरवठ्या करीता खालील प्रमाणे खर्च येईल.

१६९.७४ मे. टन X रू.२७०००/प्र.मे.टन = रू.४५,८२,९८०/-

तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा प्राप्त दर हे ३.४५% जास्त दराचे आहे. मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस केली आहे.

करीता मे.एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन, पुणे यांची PAC पावडरच्या वार्षीक पुरवठ्याची निविदा रू.२७,०००/- प्र.मे.टन या दराने रू.४५,८२,९८०/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी वापरावयाच्या Poly Aluminium Chloride Powder (PAC) चा पुरवठा करण्यासाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार, मे.एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन, पुणे यांची PAC पावडरच्या वार्षीक पुरवठ्यासाठी रू.२७,०००/- प्र.मे.टन या दराने खरेदीसाठी लागणाऱ्या रू.४५,८२,९८०/- च्या खर्चाची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १६१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती सभा दि.१०.६.२००८ ठराव क्र.४१ मध्ये मौजे उल्कानगरी (गारखेडा) येथील जनकपुरी रेखांकनामधील न.भु.क्र.१५७६७/१३०, १३१ व १३२ असे नजरचुकीने आलेले आहे. वास्तविक सदरचा **न.भु.क्र.१५७३७/१३०, १३१ व १३२** असा आहे. करीता वर नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे ,सदस्य,स्थायी समिती अनुमोदक : कचरू मोरे, सदस्य,स्थायी समिती

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती सभा दि.१०.६.२००८ ठराव क्र.४१ मध्ये मौजे उल्कानगरी (गारखेडा) येथील जनकपुरी रेखांकनामधील न.भु.क्र.१५७६७/१३०, १३१ व १३२ ऐवजी **न.भु.क्र.१५७३७/१३०, १३१ व १३२** अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद